॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत॥
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२७ (        ) :- ऑनलाईन लाँड्रीचा व्यापार अत्याधुनिक पध्दतीने अधिक सोयीयुक्त व कमी वेळेत यशस्वी करण्याच्या सादरीकरणाला तसेच जैम (वक्तृत्व) या स्पर्धेतही कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या युआयसीटी विभागातील गोविंद पाटील एम.टेक (द्वितीय वर्ष) या विद्यार्थ्याला युपिटीटीआई, कानपूर आणि युआयसीटी, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने यंग इनोव्हेटर्स समिट-२०१८ मध्ये प्रथम पारितोषिक प्राप्त झाले.

२३ ऑक्टोबर, २०१८ रोजी कानपूर (उत्तर प्रदेश) येथे युपिटीटीआई, कानपूर आणि युआयसीटी, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने यंग इनोव्हेटर्स समिट-२०१८ आयोजित करण्यात आले होते. या यंग इनोव्हेटर्स समिटमध्ये महाराष्ट्रातील २० व उत्तर प्रदेशातील ४० विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. युआयसीटीतील गोविंद पाटील या विद्यार्थ्यास ऑनलाईन लाँड्री व्यापार अत्याधुनिक पध्दतीने अधिक सोयीयुक्त व कमी वेळेत यशस्वी करण्याच्या सादरीकरणाला तसेच जैम (वक्तृत्व) या स्पर्धेतही प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. यासोबत सूरज रेवातकर व नितीन शाहू यांना बेस्ट आयडीयाचे पारितोषिक मिळाले. यासह अनेक विद्यार्थ्यांनी भविष्यातील विविध उद्योगांचे आधुनिकतेवर सादरीकरण केले.

उत्तर प्रदेशचे तंत्रशिक्षण विभागाचे संचालक एस.के.राजपूत यावेळी अध्यक्षस्थानी होते. युपिटीटीआई, कानपूरचे संचालक डॉ.मुकेश सिंग व युआयसीटी स्टार्टअप सेलचे समन्वयक डॉ.ए.के.गोस्वामी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचे कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, युआयसीटीचे संचालक प्रा.जे.बी.नाईक, स्टार्टअपचे समन्वयक डॉ.ए.के.गोस्वामी, प्रा.एस.ए.राऊत, डॉ.आर.एस.सिरसाम आदींनी अभिनंदन केले.

---

जा.क्र. : उमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 27 ऑक्टोबर,2018

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

जनसंपर्क अधिकारी

यांच्या करीता